दाखल तारीख : २४/०९/२०१४
नोंद तारीख : २४/०९/२०१४
निकाल तारीख :०५/१२/२०२४
कालावधी : १० ०२ ११
व. म. दि.

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, धरणगाव जि. जळगाव यांचे न्यायालयात.**
**(पिठासन अधिकारी आशिष द. सूर्यवंशी यांचे समक्ष)**

**नियमीत फौजदारी खटला क्र. १६९/२०१४ नि.क्र. ७३**

महाराष्ट्र शासन
मार्फत पोलीस ठाणे धरणगाव ...अभियोग पक्ष.

**विरूध्द**

१. अजय गोकुळ पवार,
वय—३८ वर्षे, व्यवसाय—नोकरी
२. उषाबाई गोकुळ पवार,
वय—६७ वर्षे, व्यवसाय— नोकरी
३. भारती भीवा पवार
वय—४२ वर्षे, व्यवसाय—गृहिणी
राहणार— खेडी, ता. जि. जळगाव. ...आरोपी

**गुन्हा:—भा.दं.वि. १८६० ४९८— अ, ४०६, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे**

.......................................................................................

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख फरीद | : | सहाय्यक सरकारी अभियोक्ता. |
| श्री. दि. म. दलाल | : | आरोपींकरीता विधीज्ञ. |

## न्यायनिर्णय
**(घोषित दिनांक :— ०५/१२/२०२४)**

आरोपींविरूध्द् सदरील खटला भारतीय दंडविधान कायदा कलम ४९८—अ, ३२३, ४०६, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे शिक्षापात्र असलेल्या गुन्हयासाठी खटला चालविण्यात आला.

**<u>सरकार पक्षाचे कथन संक्षिप्त रुपात खालील प्रमाणे:</u>**

**२.** फिर्यादी अनिता अजय पवार हिचा विवाह आरोपी क्र.०१ अजय गोकुळ पवार याच्याशी दिनांक — २४.०४.२०११ रोजी झाला. लग्ना नंतर फिर्यादी सासरी नांदण्यास गेली. फिर्यादीच्या सासरी पतीसह फिर्यादीची सासु व नणंद म्हणजेच आरोपी क्र. ०२ व ०३ अशांसह ती नांदत होती. सुरूवातीचे काही दिवस सासरच्यांनी फिर्यादीला वागणुक दिली. परंतु त्या नंतर आरोपी तिला उपाशीपोटी ठेवुन मारहाण करू लागले व तिने माहेराहुन सत्तर हजार रूपये आणावे म्हणुन तिचा शारिरीक व मानसिक छळ करू लागले. मुलगी झाली म्हणुन देखील तिला दुषणे देवु लागले. फिर्यादीचे मामांनी आरोपींनी समजावुन सांगितल्या नंतर ही आरोपींनी तिला मारझोड केली व तिला नेसत्या वस्त्रानिशी काढुन दिले. तिचे दागिने हिसकावुन नेले व तिला घ रातुन हाकलुन दिले. म्हणुन फिर्यादीने कंटाळुन आरोपीं विरूध्द पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

**३.** सदर फिर्यादी वरून गुन्हा नोंद क्रमांक <u>६२/२०१४</u> भारतीय दंड विधान कलम ४९८(अ), ३२३, ४०६, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे दाखल झाला. तपासिक अंमलदार पोलीस उपनिरीक्षक टी. एल. साबळे यांनी तपास करून तपासाअंती न्यायालयात आरोपींविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** माझे पुर्वपिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरूध्द नि. क्र. २८ अन्वये उपरोक्त कलमान्वये दोषारोप निश्चित केला आणि नि.क्र. २९ ते ३१ अन्वये आरोपींचे निवेदन नोंदविले. त्यांनी गुन्हा कबूल नसल्याचे कथन केले व खटल्याच्या संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. आरोपी विरूध्द पुरावा आल्याने त्यांचे कलम ३१३ फौजदारी प्रक्रिया संहिते अन्वये निवेदन नोंदविण्यात आले.

**५.** अभिलेखा वरील पुरावा आणि दोन्ही पक्षांचा युक्तीवाद विचारात घेता खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष

कारणमिमांसेसह पुढील चर्चे मध्ये विषद करण्यात येतात.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, आरोपींनी संगनमताने फिर्यादीला सत्तर हजार रूपये घेवुन ये अशी बेकायदेशीर मागणी पुर्ण करण्याच्या हेतूने त्रास देऊन तिचा छळ केला आणि भारतीय दंड विधान कलम ४९८(अ) सह कलम ३४ अन्वये दंडनीय अपराध केला? | नकारार्थी |
| २ | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, आरोपींनी संगनमत करून फिर्यादीला मारहाण करून दुखापत केली आणि भारतीय दंड विधान कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये दंडनीय अपराध केला? | नकारार्थी |
| ३ | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, आरोपींनी संगनमत करून लबाडीच्या इरादयाने फिर्यादीचे सोन्याचे दागिने स्वतःच्या उपयोगा करिता ठेवुन घेतले आणि वापरले आणि भारतीय दंड विधान कलम ४०६ सह कलम ३४ अन्वये दंडनीय अपराध केला? | नकारार्थी |
| ४ | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, आरोपींनी संगनमत करून फिर्यादीचा अपमान करुन त्यायोगे तिच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल किंवा तिच्याकडून अपराध घडेल अशा उद्‌देशाने तिला जाणिवपुर्वक प्रक्षोभित केले आणि भारतीय दंड विधान कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये दंडनीय अपराध केला? | नकारार्थी |
| ५ | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, आरोपींनी संगनमत करून फिर्यादीला तुला जिवंत ठेवणार नाही अशी धमकी दिली व तिच्या मनात दहशत निर्माण केली आणि भारतीय दंड विधान कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये दंडनीय अपराध केला? | नकारार्थी |
| ६ | काय आदेश? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. |

## <u>कारणमिमांसा</u>

६. आरोपींविरूध्द ठेवलेला दोषारोप सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने फिर्यादीस सा.क्र.०१ म्हणून नि.क्र ५९ नुसार तपासले आहे. तसेच फिर्यादीचे मामा मनोज रामदास चव्हाण सा.क्र.०२ यांना नि.क्र. ६३ नुसार तपासले आहे. त्याशिवाय अभियोग पक्षातर्फे फिर्याद नि.क्र. ६०, बचाव पक्षातर्फे कबुंल करण्यात आलेल्या घटनास्थळ पंचनामा नि.क्र. ६६ व जप्ती पंचनामा नि.क्र. ६७ या दस्तांवर अभियोग पक्षाने भिस्त ठेवली आहे. तथापि, आरोपींच्या वतीने कुठलाही पुरावा सादर करण्यात आला नाही.

**<u>मुद्दा क्र. १ ते ५</u> :**

७. कलम ४९८–अ प्रमाणे गुन्हा सिध्द होण्यासाठी आरोपींनी फिर्यादीला क्रुर वागणूक देणे व तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणे वा तिला दुखापत होईल किंवा तिच्या जिवीताला आणि अस्मितेला धोका निर्माण होईल एवढया तीव्रतेचा छळ होणे आवश्यक आहे. तसेच मालमत्तेची किंवा मौल्यवान वस्तुची किंवा रोख रकमेची बेकायदेशीर मागणी करण्याच्या हेतूने तिला त्रास देऊन तिचा छळ करणे याबाबी सिध्द होणे आवश्यक आहे.

८. फिर्यादी हिच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, तिने असे कथन केले आहे की, २०११ साली तिचा आरोपी क्र.०१ शी विवाह झाला. लग्नानंतर ती तिचा पती म्हणुन आरोप क्र. ०१, सासु व नणंद आरोपी क्र. ०२ व ०३ यांच्या सोबत नांदत होती. सुरूवातीचे काही काळ चांगले वागविल्या नंतर आरोपींनी तिला त्रास देण्यास सुरूवात केली. बाळंत. पणाच्या वेळेला शस्त्रक्रिये करिता आणि बाळंतपणाचा खर्च चे पैसे माहेराहुन आण असे म्हणुन आरोपींनी तिला त्रास देण्यास सुरूवात केली. सदरची बाब तिने तिच्या मामाला सांगितली असता, मामाने आरोपींना समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनी ऐकले नाही. त्यांनी तिच्या मुलीला ठेवुन घेतले आणि तिला मामासह माहेरी पाठवुन दिले. आरोपी तिला पैसे घेवुन ये, तरच

नांदायला ये, असे म्हणाले. आरोपी तिला मारहाण करून उपाशी पोटी ठेवत असत. तिने धुळे येथे महिला दक्षता केंद्रात तक्रार केली. परंतु तेथे समेट घडुन आला नाही. तिने शिरपुर न्यायालयात पोटगी मिळावी म्हणुन देखील केस दाखल केली परंतु आरोपी क्र. ०१ ने पोटगीची रक्कम भरली नाही व तिचे दागिने सुध्दा तिला परत दिले नाही. सा.क्र. ०२ ने त्याच्या पुराव्यात असे कथन केले की, फिर्यादी ही त्याची भाची आहे. आरोपी क्र. ०१ शी लग्न दि.२४.०२.२०११ रोजी झाले. त्याचे हे तिसरे लग्न होते. त्याने पूर्वीचे दोन लग्न त्यांच्या पासुन लपवुन ठेवले. लग्नाच्या एक वर्षा नंतर आरोपींनी तिला त्रास देण्यास व पैश्यांची मागणी करण्यास सुरूवात केली. बाळंतपणासाठी माहेराहुन साठ हजार रूपये आण, असे म्हणुन ते तिला मारझोड करू लागले, उपाशी पोटी ठेवु लागले. दुस—या वेळेस दिवस गेले तेव्हा आता जर तुला मुलगी झाली तर तुला सोडुन देवु असे म्हणुन तिचा मानसिक छळ करू लागले. पुढे सदर साक्षीदाराने असे ही कथन केले आहे की, फिर्यादीच्या सांगण्या वरून त्याने देखील आरोपींना समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला परंतु आरोपींनी फिर्यादीस त्रास देणे सुरूच ठेवले. तेव्हा त्याने फिर्यादीस स्वत: कडे घेवुन गेला व धुळे येथे तक्रार निवारण समिती कडे त्यांनी तक्रार केली. परंतु आरोपी लोक तेथे समेट घडविण्या करिता उपस्थित झाले नाही. पुढे फिर्यादीने शिरपुर पोलीस ठाण्यात तक्रार केली. परंतु काही उपयोग झाला नाही. म्हणुन फिर्यादीने धरणगाव पोलीस ठाण्यात आरोपीं विरूध्द फिर्याद दिली.

९. अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी वकिलांनी असा युक्तीवाद केला की, फिर्यादीने तिच्या नि.क्र. ६० वरील फिर्याद प्रमाणेच न्यायालयासमोर ही शपथेवर कथन केले आहे व सदरची फिर्याद सिध्द केली आहे. फिर्यादीच्या पुराव्यातुन आरोपींनी कश्या प्रकारे लग्ना नंतर तिचा पैश्यांची मागणी करून शारिरीक व मानसिक छळ केला ही बाब सिध्द होते. तसेच सा.क्र. ०२ हे फिर्यादीचे मामा असुन त्यांनी सुध्दा आरोपींचे फिर्यादीशी लग्नानंतरचे वागणे व

पैश्यासाठी तिचा छळ करणे या बाबत त्यांच्या साक्षीत कथन केले आहे. सदरच्या साक्षीदाराचा पुरावा फिर्यादीच्या पुराव्याला व एकंदरीत अभियोग पक्षाच्या कथनास बळकटी देणारा आहे. त्यामुळे आरोपींचे अपराधाचे कृत्य सिध्द होते. तसेच पुढे सहायक सरकारी वकिलांनी असा ही युक्तीवाद केला की, प्रस्तुतचे प्रकरण हे घरातील पैश्यांच्या मागणीवरून झालेल्या शारिरीक व मानसिक छळा बाबतचे असल्याने अभियोग पक्षाने प्रकरणात स्वतंत्र साक्षीदार तपासला नाही म्हणुन अभियोग पक्षाचे कथन खोटे ठरू शकत नाही. फिर्यादी ही पिडीता असुन तिचा पुरावा ग्राहय धरण्यात येवुन व तिच्या मामाच्या पुराव्याचा आधार घेवुन आरोपींना दोषी धरण्यात यावे असा युक्तीवाद सहायक सरकारी वकिलांनी केला आहे. तथापि, बचावपक्षातर्फे वकिलांनी असा युक्तीवाद केला की, आरोपींचे अपराधाचे कृत्य अभियोग पक्षास सर्व शंकांच्या पलिकडे जावुन सिध्द करावे लागेल. फिर्यादी व तिचा मामा यांच्या साक्षीत एक वाक्यता दिसुन येत नाही. साहजिकच फिर्यादी ही सा.क्र. २ ची भाची असल्याने ते तिची बाजु भक्कम करण्या करिता साक्ष देतील. परंतु केवळ सदर साक्षीदारांच्या पुराव्या वरून आरोपींना दोषी धरता येणार नाही. आरोपींनी कधी ही फिर्यादीस पैश्यांची मागणी केली नाही आणि सदरची मागणी केली होती, ती मागणी पुर्ण होण्याकरिता मारहाण झाली होती या बाबी सर्व शंकांच्या पलीकडे जावुन सिध्द होत नाही. म्हणुन आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात यावे असा आरोपीच्या वकिलांनी युक्तीवाद केला आहे.

**१०.** प्रस्तुत प्रकरणातील पुराव्याचे अवलोकन केले असता, असे स्पष्ट होते की, फिर्यादी व आरोपी क्र. ०१ यांचा विवाह झाला आणि विवाहा नंतर ती सासरी नांदत असताना तिच्या सोबत तिचा पती, सास व नणंद असे एकत्र राहत होते. एकत्र नांदत असताना पहिल्या वेळेस मुलगी झाली व दुस—या वेळेस देखील तुला मुलगी झाली तर, आम्ही वागवणार नाही असे म्हणुन ते तिला हिणवु लागले. पुढे फिर्यादीने असे ही कथन केले आहे की, सर्व आरोपींनी मिळुन बाळंतपणाच्या खर्चाप्रती पैश्यांची मागणी

करून तिला मारहाण केली व तिला गांजपाट केला. परंतु अभिलेखा वरून आरोपी क्र. ०१ ते ०३ यांच्या विषयी मोघम स्वरूपाचा पुरावा दिसुन येतो. फिर्यादीने तिची फिर्याद व पुराव्यात बाळंतपणाचा खर्चा करिता रूपये सत्तर हजारांची मागणी करून तिला कशा प्रकारे हिणवले तसेच तिला दुखापत केली याबाबत स्पष्ट पुरावा अभिलेखावर नाही. तसेच आरोपींनी फिर्यादीचे नेमके कोणते दागिने ठेवुन घेतले व लबाडीच्या इरादयाने स्वत:च्या फायदयासाठी उपयोग करून घेतला. तसेच फिर्याद आणि फिर्यादीचे शपथेवरील पुरावा यामध्ये सुध्दा सदर आरोपींनी कशा प्रकारे तिचा गांजपाट केला आणि इतर आरोपीं सोबत संगनमत केले याबाबत पुरावा दिसुन येत नाही. सा.क्र. ०२ हे फिर्यादीचे मामा असुन ते सुध्दा असेच कथन करतात की, सर्व आरोपींनी मिळुन फिर्यादीस पैश्यांची मागणी करून तिला गांजपाट केला आणि तिला मारहाण केली. परंतु कोणाच्याही पुराव्यातुन ही बाब स्पष्ट होत नाही की, आरोपी हे सर्वजण एकत्रच कुटुंबात राहत होते आणि त्यांनी फिर्यादीचा सर्वांनी संगनमत करून पैश्यांची मागणी पुर्ण व्हावी म्हणुन छळ केला. फिर्यादीने व तसेच तिच्या मामाने असे कथन केले आहे की, आरोपींनी फिर्यादीस तिला मारहाण करून माहेरी काढुन दिले आणि तेव्हा पासुन माहेरी राहत आहे. परंतु अभिलेखा वरील पुराव्यावरून आरोपीं विरूध्द त्यांनी फिर्यादीस पैश्यांची बेकायदेशीर मागणी करून काढुन दिले ही बाब सबळ पुराव्याविना सिध्द होत नाही.

**११.** शिवाय अभिलेखावरून असे दिसते की, एक ही स्वतंत्र साक्षीदाराची साक्ष अभियोग पक्षामार्फत नोंदविण्यात आली नाही. त्यामुळे अभियोग पक्षाच्या कथनास बळकटी मिळत नाही. विशेष नमुद करावयाची बाब म्हणजे अभिलेखा वरून फिर्यादीने धुळे येथील महिला तक्रार निवारण समिती कडे तक्रार केली होती ही बाब देखील अभिलेखा वरून सिध्द होत नाही. त्यामुळे अभियोग पक्षाच्या कथनात संशय निर्माण होतो.

**१२.** आरोपींविरूध्दचा दोषारोप संपुर्ण शंकांच्या पलिकडे जावुन

नि:संशयपणे सिध्द करण्याची जबाबदारी ही अभियोग पक्षाची असते. परंतु प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्ष अपयशी ठरल्याचे दिसुन येते. सर्व आरोपींनी संगनमत करून फिर्यादीस गांजपाट केला व पैशाची मागणी करून तिला मारहाण करून तिचा छळ केला याबाबी सिध्द होत नाहीत. यास्तव मी मुददा क्र. ०१ ते ०४ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला आहे.

**<u>मुद्दा क्र. ५</u> :**

**१३.** उपरोक्त विस्तृत कारणमिमांसे आधारे मी या निष्कर्षावर पोहोचलो आहे की, आरोपी हे संशयाचा फायदा मिळण्यास पात्र आहेत. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

०१. सर्व आरोपींना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार भारतीय दंड विधानाचे कलम ४९८(अ), ३२३, ४०६, ५०४, ५०६ सह कलम ३४ या गुन्हयांच्या आरोपांमधून सबळ पुराव्या अभावी निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

०२. आरोपींचा वैयक्तिक जातमुचलका आणि जामिनकदबा रद्द करण्यात येत आहेत आणि त्यांना त्यांच्या बंधपत्रातून मुक्त करण्यात येत आहे.

०३. आरोपींनी कलम ४३७—अ फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये प्रत्येकी रूपये १५,०००/— इतक्या रकमेचे बंधपत्र सादर करावे.

स्वा/—

दिनांक : ०५.१२.२०२४.

(आशिष द. सूर्यवंशी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
धरणगांव.